# प्रकरण सातवे

## संशोधनाचा सारांश, गुण व भाषाकौशल्ये यांची प्रमाणके आणि सूचना

### संशोधनाचा सारांश :

#### मातृभाषा अध्यापनाची गरज :

सन १९२१-२२ पासून भारतीय भाषामधून निम्नमाध्यमिक शाळेतील वर्गांना शिक्षण देण्यास सुरुवात झाली. तत्पूर्वी इंग्रजी हेच शिक्षणाचे माध्यम होते.

डॅा. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली १९४८ मध्ये विद्यापीठ शिक्षण आयोगाने प्रसिद्ध केलेल्या अहवालामध्ये प्रादेशिक भाषा हीच शिक्षणाचे माध्यम माध्यमिक शिक्षण स्तरावर पाहिजे, प्रादेशिक भाषा शिक्षणाचे माध्यम म्हणून समृद्ध व्हावयास पाहिजे, अशी शिफारस केली आहे.

डॅा. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगाच्या (१९६४-६६) अहवालामध्ये ` माध्यमिक शिक्षण मातृभाषेतून किंवा प्रादेशिक भाषेतून दिले जावे. मातृभाषा म्हणून एका विषयाचा अभ्यास करावा. राष्ट्रभाषा म्हणून हिंदी ही अनिवार्य असून संदर्भज्ञानासाठी इंग्रजी भाषेच्या अभ्यासाची आवश्यकता सांगितली आहे.

मुदलीयार आयोगामध्ये (१९५२-५३) मातृभाषेच्या अभ्यासासंबंधी शिफारस केली. मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा हीच माध्यमिक शिक्षण स्तरावरील शिक्षणाचे माध्यम असावे. माध्यमिक शिक्षण स्तरावर दोन भाषांच्या अभ्यासापैकी मातृभाषेचा अभ्यास असावा. असे या आयोगामध्ये सांगितले आहे.

मातृभाषेमधून आपण आपल्या भावना, विचार, इच्छा, आकांक्षा, व्यक्त करीत असतो. दुसऱ्यांच्या भावना, सुखदु:खे आपण मातृभाषेमधून समजून घेतो आणि त्यांच्या सुखदु:खात सहभागी होतो. म्हणजे मातृभाषा हे आत्माविष्काराचे माध्यम आहे.

आपण आपले दैनंदिन व्यवहार भाषण, श्रवण, वाचन, लेखन याद्वारे पार पाडतो. सामाजिक व्यवहारांचे संचालन मातृभाषा करते. मातृभाषेतून विचार, सुखदु:खे यांची देवाणघेवाण केली जाते. म्हणून ती दैनंदिन व्यवहाराचे माध्यम आहे.

मातृभाषा ही ज्ञानार्जनाचे साधन आहे. माणसाला मिळालेले बरे-वाईट अनुभव भाषेत शब्दग्रंथित केले. प्रत्येक पिढीकडून त्या अनुभवांची जपणूक केली गेली आणि त्यांच्या अनुभवांची त्यात भर पडली. मानवाच्या कौटुंबिक भावना, सामाजिक जीवनविषयक कल्पना व ध्येये, आत्मविकासाच्या इच्छा हे सर्व त्यात सामावले होते. नव्या पिढीच्या सहजप्रेरणांना वळण देण्याचे, त्यांचे उदात्तीकरण करण्याचे सामर्थ्य त्यामध्ये होते. भाषा जरी मानवाने तयार केली असली तरी ती मानवाचा विकास घडविते.

मातृभाषा ही संस्कृती संवर्धनाचे माध्यम आहे. संस्कृतीचा आणि पूर्वजांच्या ज्ञानाचा वारसा आपणाला मायबोलीतून मिळतो. संस्कृती म्हणजे मानवी वंशाचे आचार-विचार, त्यांच्या कला, वाङ्मय व शास्त्रे, त्यांची भौतिक व आध्यात्मिक प्रश्नाकडे बघण्याची दृष्टी, त्यांची जीवनमूल्ये यांचा विचार. पूर्वजांच्या वाङ्मयाचा पध्दतशीर अभ्यास आणि त्या वाङ्मयात प्रतिबिंबीत झालेल्या संस्कृतीची जोपासना ह्या दृष्टीने मातृभाषा हेच एकमेव माध्यम आहे.

बोलीभाषा व प्रमाणभाषा :

बोलीभाषेचे महत्व कमी न लेखता बोलीभाषेतूनच प्रमाणभाषेने सामर्थ्य प्राप्त करावे आणि अध्ययनासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्यात

प्रमाणभाषेमुळे न्यूनगंड निर्माण होऊ नये एवढी दक्षता अध्यापकांनी घेतली पाहिजे.

केवळ माध्यमिक शिक्षण स्तरावर विद्यार्थ्यांना येणाऱ्या भाषेतूनच मराठीचे अध्यापन करावयाचे म्हटले तर विद्यार्थ्यांना त्यामध्ये रस वाटणार नाही. आपण नवीन काय शिकतो ? अशाप्रकारची दृष्टी वाढते आणि मराठी भाषेच्या अध्यापनाकडे बघण्याचा दृष्टीकोणही आपोआप बदलतो.

शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषेचा विकास :

सन १९११ ते ३७ या काळामध्ये शाळांची संख्या वाढूनही शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजीच राहिले. पण यावेळी राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या भारतीय शिक्षण संस्था सुरू झाल्या.

सन १९३७ ते ४७ या काळामध्ये देशी भाषेतील पुरेशी पुस्तके तयार झाली, पारिभाषिक शब्द अद्ययावत झाले. त्यामुळे सन १९४७ पासून माध्यमिक शिक्षण स्तरावर मात्र भाषा हे शिक्षणाचे माध्यम झाले.

मातृभाषेचे शासकीय व सामाजिक स्थान :

सर्व शासकीय स्तरावर मराठी भाषेमध्ये पत्रव्यवहारास मान्यता असली तरी प्रत्यक्षात मराठी भाषेचे शासकीय व्यवहारातील अस्तित्व कमी आहे. परिपत्रके, न्यायालये या ठिकाणी इंग्रजी भाषेतून सर्व व्यवहार चालतात.

समाजामध्ये याचे पडसाद उमटतातच. पालक आणि विद्यार्थी मराठी भाषेच्या अध्ययनापेक्षा इंग्रजी भाषेच्या अध्ययनाकडे चटकन आकर्षित होतात.

मातृभाषेतील संशोधनाची क्षेत्रे :

दृक्-श्राव्य साधनांचा वापर अध्ययन-अध्यापनामध्ये प्रभावीपणे करता येईल काय हे प्रयोगाने पडताळून पहाता येईल. मराठीच्या अध्ययन-अध्यापना-साठी जनसंपर्काच्या माध्यमाचा उपयोग, पाठांतरासाठी उतारे कोणते निवडावेत, कसे पाठांतर करावे, निबंध लेखनात त्यांचा उपयोग इत्यादींच्या संबंधात संशोधन होणे आवश्यक आहे.

संशोधन समस्या :

माध्यमिक शाळामधील मराठी अध्यापकास प्रभावी अध्यापनासाठी आवश्यक ते गुण व भाषाकौशल्ये किती प्रमाणात आवश्यक त्याची प्रमाणके तयार करणे.

संशोधनाची उद्दिष्टे :

अ) मराठी अध्यापकास आवश्यक त्या गुणांचा अभ्यास करणे.

ब) मराठी अध्यापकास आवश्यक त्या भाषाकौशल्यांचा अभ्यास करणे.

क) अध्यापन प्रभावी होण्यासाठी आवश्यक त्या गुण व भाषा-कौशल्यांची प्रमाणके तयार करणे.

ड) प्रभावी अध्यापनासाठी उपाय सुचविणे.

गृहीतके :

मराठी अध्यापकाकडे निश्चित असे गुण, भाषाकौशल्ये असावी लागतात. ते गुण व भाषाकौशल्ये प्रभावी अध्यापनासाठी आवश्यक असतात.

संशोधन समस्येचे महत्व :

मराठी अध्यापक, विद्यार्थी व त्यांचे पालक (समाजाचा घटक म्हणून), शिक्षण खाते, शाळांचे मुख्याध्यापक, या सर्वांच्यासाठी सदरचे संशोधन

महत्वाचे आहे. मराठी अध्यापकांना या संशोधनावरून आत्मनिरीक्षणाने बरेच शिकता येण्यासारखे आहे.

संशोधनाच्या मर्यादा :

सांगली जिल्ह्यातील तीन तालुक्यातील (तासगाव, खानापूर, वाळवा) माध्यमिक शाळा आणि प्रत्येक माध्यमिक शाळेतील दोन ज्येष्ठ मराठीचे अध्यापक संशोधनासाठी निवडले. संशोधनासाठी जनसंख्या (Population) १३८ मराठी अध्यापक असून नमुना म्हणून १५६ मराठी अध्यापक अभ्यासासाठी निवडले.

संशोधनाचे दुसरे प्रकरण 'कार्यपद्धती' असून त्यामध्ये, सर्वेक्षण-पद्धती, संशोधनाची साधने, नमुना-निवड पद्धती, सांख्यिकीय प्रक्रियेचा अवलंब, संशोधनाचा कालावधी याबाबींचा सांगोपांग विचार केला आहे.

संशोधनाचा विषय ही सामुहिक सामाजिक समस्या असल्यामुळे या संशोधनातून मराठी अध्यापकांना जागृत करण्याच्यादृष्टीने या सामुहिक समस्येचे अध्ययन करण्यासाठी सर्वेक्षण पद्धती निवडली.

संशोधनासाठी मतावली आणि प्रश्नावली या दोन साधनांचावापर केला. मराठी अध्यापकास आवश्यक ते गुण आणि भाषाकौशल्यांचा अभ्यास करून त्याची अद्ययावत यादी तयार केली व त्यावर तज्ञ अध्यापकांची मते अजमावून घेतली. त्यामुळे तयार झालेल्या यादीला निर्दोष स्वरूप देण्यास मदत झाली. प्रश्नावलीच्या सहाय्याने मराठी अध्यापकांच्याकडे असणारे गुण आणि भाषा-कौशल्ये यांची आधारसामग्री गोळा केली. त्यासाठी प्रश्नावलीचे तीन टप्पे तयार केले - (अ) प्रश्नावली क्र. १ यातून मराठी अध्यापकांची प्राथमिक माहिती. (ब) प्रश्नावली क्र. २ मध्ये अध्ययन-अध्यापन कृती देऊन त्यांचा अवलंब करणाऱ्या अध्यापकांच्या अंगी असणारे गुण आणि भाषाकौशल्ये यांचे सर्वेक्षण केले. तसेच (क) प्रश्नावली क्र. ३ या प्रश्नावली मधूनही मराठी अध्यापकांच्या

अध्यापनासंबंधी आधारसामग्री एकत्रित करून त्यातून आढळून आलेले त्यांचे गुण व भाषाकौशल्ये यांचे सर्वेक्षण केले.

मराठी अध्यापकांच्याकडून आधारसामग्री गोळा करण्यासाठी नमुना-निवड करताना सरल यादृच्छिक नमुना निवड ( Simple random sampling) व स्तरीत नमुना निवड ( Stratified Sampling ) यांचा उपयोग केला. कारण, सरल यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने आधार सामग्रीतील प्रत्येक एककास ( element ) मिळणारी संधी सारखी असते, स्तरीकरणाने नमुन्यांची प्रातिनिधिकता व परिणामकारकता वाढते.

संशोधन विषयाचा अभ्यास करताना पाल्हाळिकता टाळण्याच्या दृष्टीने सांख्यकीय प्रक्रियेचा अवलंब केला. प्रश्नावलीवर १, २, ३, ४, ५ असे अंक टाकले आणि त्यांची यादी करून मराठी अध्यापकांच्याकडे भरण्यासाठी पाठवून दिली.

मराठी अध्यापकांसाठी आवश्यक गुण व भाषाकौशल्ये यांचा अभ्यास करून त्यांची यादी तयार केली. त्यावर तज्ञांची मते अजमावली. त्यांनी सुचविलेल्या प्रमाणे यादी दुरुस्त करून घेतली. त्यावर प्रश्नावली तयार करून घेतली. त्यांची पूर्वचाचणी व मराठी अध्यापकांच्याकडून भरून येण्यासाठी कालावधी, आधारसामग्रीचे संकलन, संकेतीकरण, सारणीकरण, अहवाल लेखन व टंकलेखन व अहवालबांधणी यासाठी एकूण अडीच वर्षाचा कालावधी लागला.

तिसऱ्या प्रकरणामध्ये ` संशोधनपर संदर्भांचा अभ्यास ` याबाबत तपशील नोंदविला. शिवाजी विद्यापीठातील मराठी विषयाचे पीएच्.डी. साठी दाखल झालेल्या ३५ प्रबंधातील काही प्रबंध, शिक्षणशास्त्र विषयामध्ये मुंबई, पुणे , नागपूर व मराठवाडा या चार विद्यापीठातील पीएच्.डी. पदवी-साठी दाखल झालेले (संशोधन विषयानुरागाने) १० प्रबंध. तसेच शिक्षणशास्त्र विषयामधील मुंबई, नागपूर, विद्यापीठातील एम्.एड्. पदवीसाठी दाखल झालेले २० प्रबंध यांचा मागोवा या प्रकरणामध्ये घेतला.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांचा दशवार्षिक अहवाल - निष्कर्ष आणि महाराज सयाजीराव विद्यापीठ बडोदा येथील शिक्षणशास्त्र आणि मानसशास्त्र विभागामार्फत बी.एड्.च्या विद्यार्थ्यांनी केलेला लघुप्रकल्प यांचा उल्लेख या प्रकरणामध्ये करण्यात आला.

चवथ्या प्रकरणामध्ये ` मराठी अध्यापकांचे गुण-आधारसामग्री संकलन ` केले. विद्यार्थ्यांच्या मुलाखतीमधून मराठी भाषेच्या अध्ययनासंबंधी आढळलेले गैरसमज प्रश्नावलीमधून संकलीत केलेल्या आधारसामग्रीचे संस्करण ( Editing ), संकेतीकरण ( Coding ), संकेतिकरणाची विश्वसनीयता, संकेतीकरणाच्या आधारे मोजणी, आधारसामग्रीसंबंधी सर्वसाधारण स्पष्टीकरण या बाबींचा उहापोह केला.

शंभर विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यामध्ये मराठी भाषा सोपी म्हणून दुर्लक्ष करणारे, मराठी भाषा जीवनोपयोगी नाही म्हणून दुर्लक्ष करणारे व मराठीचे अध्यापक परिणामकारक अध्यापन करीत नाहीत म्हणून दुर्लक्ष असे विद्यार्थ्यांचे समज-गैरसमज आढळून आले.

संकलीत केलेल्या आधारसामग्रीची तपासणी करून घेतली त्यामुळे आधारसामग्रीची गुणवत्ता वाढण्यास मदत झाली.

संकेतीकरणासाठी आधारसामग्रीच्या भिन्नतेनुसार काही ठिकाणी अंकसंकेत ( Numerical Codes ) तर काही ठिकाणी अंकसंकेत (Numerical Codes ) व वर्णसंकेत ( Alphabetical Codes ) यांचा वापर केला.

संकेतीकरण आधारसामग्रीच्या आधारे तपासून घेतल्यामुळे संकेतीकरणाची विश्वसनीयता वाढण्यास मदत झाली. संकेतीकरणाच्या आधारे संकलीत आधारसामग्री मोजणी केली व त्या सांख्यकीय आकडेवारीवरून सर्वसाधारण स्पष्टीकरण केले.

मराठी अध्यापकांच्याकडून प्रश्नावल्या भरून घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचाही यामध्ये उल्लेख केला.

पाचव्या प्रकरणामध्ये ` मराठी अध्यापकांची भाषाकौशल्ये - आधारसामग्री संकलन ` केले. यामध्ये भाषाकौशल्यांचे अध्यापनातील स्थान, भाषाकौशल्ये आधारसामग्रीचे संकलन, आधारसामग्रीचे संस्करण, संकेतीकरण, संकेतीकरणाची विश्वसनीयता, संकेतीकरणाच्या आधारे आधारसामग्रीची मोजणी आणि सांख्यकीय आकडेवारीच्या आधारे सर्वसाधारण स्पष्टीकरण केले.

भाषण, लेखन, वाचन, श्रवण कौशल्यांचा परस्पर संबंध, भाषिक कौशल्यांच्या विकासातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास यांची चर्चा केली.

मराठी अध्यापकांच्याकडून भरून आलेल्या प्रश्नावलीतील भाषा-कौशल्यानुषंगाने असणारी आधारसामग्री संकलीत करून संकेतीकरणाच्यादृष्टीने तपासून पाहिली. आधारसामग्रीचे संस्करण करून घेतल्यामुळे तिची गुणवत्ता वाढण्यास मदत झाली. अंकसंकेतांच्या साह्याने संकेतीकरण केले. संकेतीकरण आधारसामग्रीच्या आधारे तपासून विश्वसनीयता पाहिली.

संकेतीकरणाच्या आधारे आधारसामग्रीची मोजणी केली व सांख्यकीय आकडेवारीवरून सर्वसाधारण स्पष्टीकरण केले.

सहाव्या प्रकरणामध्ये ` मराठी अध्यापकास आवश्यक गुण व भाषा-कौशल्ये - विश्लेषण व निर्वचन ` केले. यामध्ये आधारसामग्रीचे विश्लेषण निर्वचन करण्याची गरज, आधारसामग्रीचे विश्लेषण व निर्वचन यासंबंधी उहापोह केला. मराठी अध्यापकांच्या शैक्षणिक पात्रता, वय, शाळेपासून रहाण्याचे अंतर, कौटुंबिक दर्जा, वैवाहिक दर्जा, छंद, अध्यापनानुभव व शाळेला जाण्याचा प्रकार यासंबंधीची विश्लेषण करून निर्वचन केले.

अध्ययन-अध्यापन कृतीमधून मराठी अध्यापकांच्या अंगी असणारा गुण प्रकट होत असल्यामुळे, ५० टक्के पेक्षा अधिक प्रमाणात अध्ययन-अध्यापन कृती करणाऱ्या अध्यापकांच्या संख्येचे ५० टक्के पेक्षा कमी प्रमाणात अध्ययन-अध्यापन कृती करणाऱ्या अध्यापकांच्या संख्येचे, अध्ययन-अध्यापन कृती न करणाऱ्या अध्यापक संख्येचे सरासरी मध्यमान (Average-Mean ) काढले. या सरासरी मध्यमान अध्यापक संख्येवरून ५० टक्के पेक्षा अधिक प्रमाणात अध्ययन-अध्यापन कृती करणाऱ्या अध्यापकांची शेकडेवारी, ५० टक्के पेक्षा कमी प्रमाणात अध्ययन-अध्यापन कृती करणाऱ्या अध्यापकांची शेकडेवारी व अध्ययन-अध्यापन कृती न करणाऱ्या अध्यापकांची शेकडेवारी काढली व मराठी अध्यापकास आवश्यक गुण व भाषाकौशल्ये यांचे विश्लेषण व निर्वचन केले.

गुण व भाषाकौशल्ये यांची प्रमाणके :

५० टक्के पेक्षा अधिक प्रमाणात अध्ययन-अध्यापन कृती करणाऱ्या मराठी अध्यापकांच्या सरासरी संख्येची शेकडेवारी काढून प्रभावी अध्यापनासाठी आवश्यक असणाऱ्या गुण व भाषाकौशल्ये यांची प्रमाणके तयार केली.

मराठी अध्यापकास प्रभावी अध्यापनासाठी आवश्यक ते गुण व भाषाकौशल्ये यांची प्रमाणके :

| अ.नं. | गुण | अध्ययन-अध्यापन कृती | ५० टक्के पेक्षा जास्त प्रमाणात करणाऱ्या ~~संख्या~~ अध्यापकांची ~~संख्या~~ |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | (प्र.२ वरून) विद्यार्थ्यांविषयी जिव्हाळा | विद्यार्थ्यांच्या मौतिक अडवणी दूर करणे. | ९१ |
| | | आकलनावरील प्रश्न विचारणे. | १०५ |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| | | क्षमाशीलवृत्तीने चुका नजरेस आणून देणे. | ११० |
| | | गुणी विद्यार्थ्यांचा गौरव करणे. | ११६ |
| | | न्युनगंड निर्माण न होता चुका नजरेस आणून देणे. | १०२ |
| | | अभ्यासात आड येणारी विद्यार्थ्यांची व्यसने दूर करणे. | ९६ |
| | | अभ्यासाला विघातक छंद व संवयी दूर करणे. | १०१ |
| | | सरासरी मध्यमान | १०३ |
| | | शेकडेवारी | ७८.६ |
| १. | (प्र.१ वरून) अध्यापन विषयाचे नियोजन | स्वाध्याय वह्या तपासून त्यातील चुका दुरूस्ती करवून घेणे. | १०६ |
| | | मासिक गृहपाठ नियोजन करणे. | १०८ |
| | | सहशालेय उपक्रमांना विचारात घेऊन घटक नियोजन करणे. | १०४ |
| | | पाठाचे तपशीलवार टिप्पण तयार करणे. | ९६ |
| | | वाङ्मयीन प्रकारानुसार घटक नियोजन करणे. | ८८ |
| | | दैनिक पाठ टाचण काढणे. | ९९ |
| | | पाठाचे त्रोटक टिप्पण तयार करणे. | ९९ |
| | | पाठातील मुख्य मुद्यांचे टिप्पण करणे. | ११० |
| | | सहजपणे उत्तरे देता येतील असे स्वाध्याय देणे. | १०९ |
| | | सरासरी मध्यमान | १०१.७ |
| | | शेकडेवारी | ७७.६ |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| ३. | (प्र.१ वरून) प्रभावी व्यक्तिमत्व | अनुकरित्या फलक लेखन करणे. | १२० |
| | | शुध्दलेखन नियमांचा अभ्यास करणे. | ८५ |
| | | व्याकरण विषयक ज्ञान वाढविणे. | ११९ |
| | | शब्दव्युत्पत्ती सांगणे. | ९२ |
| | | सरासरी मध्यमान. | १०४ |
| | | शेकडेवारी. | ७९.४ |
| | (प्र.२ वरून) प्रभावी व्यक्तिमत्व | मनावर प्रभाव पाडणाऱ्या दोन कादंबऱ्या, दोन नाटके. | १३१ |
| | | शेकडेवारी. | १०० |
| | | सरासरी (शेकडेवारीची). | ८९.७ |
| ४. | (प्र.१ वरून) संशोधन-शीलता | उच्चार : | |
| | | शब्द अनुकरित्या उच्चारणे. | १३० |
| | | अचूक उच्चारांची आवर्तने करवून घेणे. | ९१ |
| | | अचूक उच्चारांची टेप केलेली व्याख्याने ऐकविणे. | ७६ |
| | | अचूक शब्दोच्चार सामुदायिक म्हणवून घेणे. | ९८ |
| | | दृक् साधनांचा वापर करणे. | १०५ |
| | | वाचन : | |
| | | स्वत: निर्दोष वाचन करून दाखविणे. | १२९ |
| | | स्पष्ट आवाजात वाचन करवून घेणे. | ११४ |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| | | अर्थहानी न होता वाचावयास शिकविणे. | ११७ |
| | | अर्थ आकलनाच्यादृष्टीने विरामचिन्हांनुसार वाचन करणे. | ११३ |
| | | <u>हस्ताक्षर</u> : | |
| | | विद्यार्थ्यांकडून सुवाच्य अक्षरलेखन करवून घेणे. | १२१ |
| | | अक्षरात, शब्दात,योग्य अंतर तपासून पहाणे. | ८९ |
| | | विरामचिन्हांचा वापर शिकविणे. | ११७ |
| | | हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करणे. | १०२ |
| | | <u>पाठांतर</u> : | |
| | | योग्य पाठांतर पध्दती समजावून सांगणे. | ९५ |
| | | मूळ विषयास अनुसरून पाठांतर करावयास शिकविणे. | ९३ |
| | | सरासरी मध्यमान | १०४ |
| | | शेकडेवारी | ७९.४ |
| | (प्र.३ वरून) दृक्-श्राव्य साधनांचा वापर | अध्यापनात वापरलेली दृक्साधने | १०३ |
| | | अध्यापनात वापरलेली श्राव्य साधने | ११५ |
| | | पालक व मागील विद्यार्थी यातील अंतर | १३८ |
| | | सरासरी मध्यमान | ११८.७ |
| | | शेकडेवारी | ८९.४ |
| | | प्र.१ व ३ वरून सरासरी (शेकडेवारीची) | ८२.४ |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| ५. | (प्र.१ वरून) वाङ्‌मयीन संस्कारक्षम मन | भजन, पोवाडे, लावण्या, लोकगीते संकलीत करणे. | ७९ |
| | | विद्यार्थ्यांचे हस्तलिखित मासिक काढणे. | १०५ |
| | | वर्गवार लेखन मंडळे तयार करणे. | ७० |
| | | नाट्यवाचनातून भावनाभिनिवेश व्यक्त करणे. | १०८ |
| | | सरासरी मध्यमान | ९०.५ |
| | | शेकडेवारी | ६९.१ |
| | (प्र.३ वरून) वाङ्‌मयीन संस्कारक्षम मन. | आपण लिहिलेल्या दोन कविता. | ५१ |
| | | शेकडेवारी | ३६.६ |
| | | प्र. २ व ३ वरून सरासरी (शेकडेवारीची) | ५२.८ |
| ६. | (प्र. २ वरून) आत्मविश्वासपूर्ण अध्यापन | अभ्यासक्रमाचे पूर्ण ज्ञान प्राप्त करणे. | ११५ |
| | | स्वविचार सोप्या शब्दांत मांडण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या अंगी वाढविणे. | ११४ |
| | | सोपी भाषा वापरणे. | १२१ |
| | | सरासरी मध्यमान | ११६.८ |
| | | शेकडेवारी | ८९.१ |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| ७. | (प्र. २ वरून) अध्यापन तंत्र ज्ञान | विचारप्रवर्तक प्रश्न विचारणे. | ११३ |
| | | बुध्दीला आवाहन देणारे प्रश्न विचारणे. | १०६ |
| | | मध्यम बौध्दिक कुवतीनुसार प्रश्न विचारणे. | १०३ |
| | | स्मरणशक्तीवरील प्रश्न विचारणे. | ११८ |
| | | बहुपर्यायी प्रश्न विचारणे. | ९५ |
| | | वाक्यपुर्तन प्रश्न विचारणे. | ९२ |
| | | वाक्य जुळणी प्रश्न विचारणे. | ८८ |
| | | म्हणी, वाक्प्रचार, ऐतिहासिक, पौराणिक उदाहरणे सांगणे. | ११५ |
| | | आवड निर्माण करणारे अध्यापन तंत्र वापरणे. | १२० |
| | | विद्यार्थ्यांच्या कल्पनाविलासाला वाव देणे. | १०३ |
| | | स्वयंशिक्षण पध्दतीचा अवलंब करणे. | ७६ |
| | | प्रकल्प पध्दतीचा अवलंब करणे. | ७१ |
| | | डाल्टन पध्दतीचा अवलंब करणे. | ७५ |
| | | व्याख्यान पध्दतीचा अवलंब करणे. | ८८ |
| | | चर्चा पध्दतीचा अवलंब करणे. | १०८ |
| | | सरासरी मध्यमान | ९८.१ |
| | | शेकडेवारी | ७४.९ |
| | (प्र. ३ वरून) अध्यापन तंत्र ज्ञान | स्वयंशिक्षण अध्यापन पध्दती - गुण व दोष. | १०६ |
| | | प्रकल्प पध्दती - गुण व दोष | ९९ |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| | | व्याख्यान पध्दती - गुण व दोष | १०० |
| | | वापरलेली दोन दोन संदर्भ पुस्तके | ८९ |
| | | सरासरी मध्यमान | ९८.५ |
| | | शेकडेवारी | ७०.९ |
| | | प्र.१ व २ वरुन सरासरी (शेकडेवारीची) | ७२.९ |
| ८. | (प्र. १ वरुन) बहुश्रुतता | स्वत: शैक्षणिक सहली, प्रवास यामध्ये सहभागी होणे. | ११२ |
| | | परिसंवाद आयोजित करणे. | ७६ |
| | | पाठांतरासाठी योग्य म्हणी, वाक्प्रचार, काव्यपंक्ती, सुभाषिते सुचविणे. | ११८ |
| | | सर्व वाङ्मयप्रकारांची माहिती करुन देणे. | १०१ |
| | | कवि, लेखक इ.चे संमेलन आयोजित करणे. | ८२ |
| | | वर्गवार वक्तृत्व मंडळे तयार करणे. | ७७ |
| | | सरासरी मध्यमान | ९४.३ |
| | | शेकडेवारी | ७२ |
| | (प्र. २ वरुन) बहुश्रुतता | आपण दिलेली व्याख्याने - विषय | १०८ |
| | | आपण ऐकलेले कार्यक्रम - व्याख्याने, परिसंवाद, चर्चा, सत्रे, कथाकथन, ग्रंथ परिक्षण इत्यादी. | १२५ |
| | | सरासरी मध्यमान | ११६.५ |
| | | शेकडेवारी | ८३.८ |
| | | प्र.१ व २ वरुन सरासरी (शेकडेवारीची) | ७७.८ |

| १. | २. | ३. | ४. |
| --- | --- | --- | --- |
| ९. | (प्र. ९ वरून) इतर अध्यापकांचे सहकार्य | शुध्द उच्चार करण्याबाबत इतर विषय-शिक्षकांचे सहकार्य घेणे. | ९८ |
| | | निर्दोष वाचन करण्याबाबत इतर विषय-शिक्षकांचे सहकार्य घेणे. | ८७ |
| | | वळणादार फलक लेखन करण्याबाबत इतर विषय शिक्षकांचे सहकार्य घेणे. | ८३ |
| | | संदर्भज्ञान वाढीसाठी ग्रंथसूची देण्याबाबत इतर विषय शिक्षकांचे सहकार्य घेणे. | ९६ |
| | | हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्याबाबत इतर विषय शिक्षकांचे सहकार्य घेणे. | १०१ |
| | | निबंध स्पर्धा आयोजित करण्याबाबत इतर विषय शिक्षकांचे सहकार्य घेणे. | १०४ |
| | | सरासरी मध्यमान | ९४.८ |
| | | शेकडेवारी | ७२.२ |
| १०. | (प्र. ९ वरून) अभ्यासपूरक परीक्षा | विद्यार्थ्यांना बहि:स्थ परीक्षांना बसविणे. | ८२ |
| | | शेकडेवारी | ६२.६ |
| | (प्र. ३ वरून) अभ्यासपूरक परीक्षा | भाषाभगिनी विषयी आदर : विद्यार्थ्यांना कोणकोणत्या बहि:स्थ परीक्षांना बसविता ? | २० |
| | | शेकडेवारी | १४.४ |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| ११. | (प्र. १ वरून) नाट्यात्मकता | नाट्यवाचनात पात्रसंवादानुरूप हावभाव करणे. | ८७ |
| | | पात्रसंवादानुसार आवाजात चढउतार करणे. | १०६ |
| | | नाटक, एकांकिकेमध्ये काम करण्यास उत्तेजन देणे. | १०२ |
| | | स्वत: नाटकात काम करणे. | ७४ |
| | | सरासरी मध्यमान | ९२.५ |
| | | शेकडेवारी | ७०.६ |
| | (प्र. ३ वरून) नाट्यात्मकता | दिग्दर्शित केलेली दोन नाटके व भूमिका केलेली दोन नाटके | ६५ |
| | | शेकडेवारी | ४६.८ |
| | | प्र.२ व ३ वरून सरासरी (शेकडेवारीची) | ५८.७ |
| १२. | (प्र. ३ वरून) उद्दिष्ठानुरूप अध्यापन | मराठी विषयाच्या अध्यापनाची मूलभूत उद्दिष्टे | ३८ |
| | | शेकडेवारी | २७.२ |
| | (प्र. २ वरून) श्रवण | महत्वपूर्ण संज्ञांचे आकलन होईल अशा-पध्दतीने श्रवण करणे. | ९५ |
| | | मध्यवर्ती कल्पना समजावून घेऊन श्रवण करणे. | १०७ |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| | | अर्थ समजावून घेऊन श्रवण करणे. | १११ |
| | | सरासरी मध्यमान | १०४.५ |
| | | शेकडेवारी | ७९.८ |
| (प्र. २ वरून) वाचन | | विद्यार्थ्यांना पूरक वाचन सुचविणे. | ९८ |
| | | वाचनातील विचार वटकन कळण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या अंगी वाढविणे. | १०५ |
| | | वर्गवार वाचन मंडळे तयार करणे. | ७० |
| | | ताल व भाव यांचा अविष्कार घडविणारे पद्य वाचन करणे. | १०६ |
| | | सरासरी मध्यमान | ९४.८ |
| | | शेकडेवारी | ७२.४ |
| (प्र. २ वरून) उच्चार | | वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे. | ११२ |
| | | श्राव्य साधनांचा वापर करणे. | ८० |
| | | आकाशवाणीवरील शालेय पाठ ऐकविणे. | ७८ |
| | | विद्यार्थ्यांच्याकडून अचूक शब्दोच्चारांची आवर्तने करणे. | ११५ |
| | | सरासरी मध्यमान | ९६.२ |
| | | शेकडेवारी | ७३.४ |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| | (प्र. १ वरून) उपयोजन | कविताना चाल बसविणे. | ८९ |
| | | अर्थपूर्ण वाचनावर आधारीत लेखन स्वाध्याय देणे. | १०१ |
| | | सरासरी मध्यमान | ९५ |
| | | शेकडेवारी | ७१.५ |
| | (प्र. २ वरून) अवलोकन, चिंतन, मनन | श्रेष्ठ साहित्य प्रकारांचे वाचन, चिंतन मनन, करणे. | १११ |
| | | शेकडेवारी | ८४.७ |
| | (प्र. १ वरून) प्रकटीकरण | अ) कथन : | |
| | | निवेदन : | |
| | | पांडित्यपूर्ण शब्दमाध्यमातून महत्वाचे विचार मांडणे. | ८० |
| | | संभाषण : | |
| | | अलंकारीक शब्दमाध्यमातून महत्वपूर्ण विचार मांडणे. | ९८ |
| | | भाषण : | |
| | | भाषणाचा आशय तात्काळ समजण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या अंगी वाढविणे. | १०२ |
| | | वातावरण निर्मिती : | |
| | | रसानुरूप शब्द, वाक्यांश यावर भर देऊन नाट्यवाचन करणे. | १०२ |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| | | कथाकथन : | |
| | | विद्यार्थ्यांना गोष्टी सांगणे. | ९८ |
| | | स्पष्टीकरण : | |
| | | आकृत्याद्वारे माहिती सांगणे. | १०० |
| | | ब) गायन : | |
| | | गायन स्पर्धा आयोजित करणे. | ७९ |
| | | क) लेखन : | |
| | | अचूक लेखन आवर्तने करणे. ~~लेखन सराव देणे.~~ | ८५ |
| | | ~~लेखन सराव देणे~~ | ११२ |
| | | वर्णन : | |
| | | निबंध स्पर्धा आयोजित करणे. | १०७ |
| | | फलकावर सुविचार लिहून घेणे. | १०० |
| | | सरासरी मध्यमान | ९६.६ |
| | | शेकडेवारी | ७३ |
| (प्र.१ वरून) पाठांतर | | अर्थपूर्ण पाठांतर समजावून देणे. | ९७ |
| | | सरासरी मध्यमान | - |
| | | शेकडेवारी | ७४ |

अध्यापकांमध्ये आवश्यक सर्वसाधारण गुण यामध्ये खालील बाबींचा समावेश केलेला आढळतो :

"Scores on tests of verbal and other cognitive abilities, scores on tests of knowledge and understanding of general and special subject matter. Scores on tests of professional informations, course marks representing academic achievement, course marks representing performance in student teaching. Amount of general and of professional education, scores derived from inventories and/or projective devices developed to measure various personality traits, and emotional and social adjustement. Scores on attitude scales and inventories developed to measure teacher-student relationships. Age, experience, sex, martial status, socio-economic states, speech and voices characteristics factors influencing choice of teaching as a career; social participation; Expressions of interest in, participation in and preference for various sorts of activities."

"Measured intellectual abilities, achievement in college course, general cultural and special subject teaching marks, emotional adjustment, attitudes favourable to students, generosity in appraisals of the behaviour and motives of the persons, strong interest in reading and literary matters, participation in social and community affairs, a vocational abilities all appear characteristics of the teacher which are likely to be positively correlated or associated with teacher effectiveness in the abstract." [1]

मराठी अध्यापकांचे शुध्द उच्चार हे लेखनाच्यादृष्टीने एक साधन आहे.

"The ability to pronounce the written symbols correctly is considered to be an aid to comprehension of written material."[2]

निष्कर्ष :

मराठी अध्यापकांच्या अंगी प्रभावी अध्यापनासाठी आवश्यक ते गुण आणि भाषाकौशल्ये यांच्या अध्ययन, अध्यापन कृतीमधून व्यक्त झालेले असून बहुतांशी मराठी अध्यापकांच्या अंगी हे गुण आणि भाषाकौशल्ये असल्याचे आढळून आले. बहुसंख्य मराठी अध्यापकांनी प्रश्नावलीतील अध्ययन-अध्यापन कृती आवडत असल्या तरी प्रत्यक्षात केलेल्या अध्ययन-अध्यापन कृतीनाच × अशी खुण केली आहे, असे दिसले नाही. शेकडा ४१.८ मराठी अध्यापकांचा त्यांच्या पदवीला मराठी विषय नसल्याचे व शेकडा १६.४ मराठी अध्यापकांना मराठी अध्यापनाचे प्रशिक्षण नसल्याचे आढळून आले. त्यामुळे मराठी विषयाचा सखोल अभ्यास व अध्यापन तंत्र ज्ञान यांच्या अभावी, अध्ययन-अध्यापन कृतींची आवड असूनही त्या करता आल्या नाहीत असे दिसून आले.

खालील गुण व भाषा कौशल्ये बहुतांशी मराठी अध्यापकांच्या अध्ययन-अध्यापन कृतीतून व्यक्त झाल्याने प्रभावी अध्यापनासाठी त्यांची आवश्यकता असल्याचे आढळून आले.

| अ.नं. | गुण | अध्ययन-अध्यापन कृती |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांविषयी जिव्हाळा | विद्यार्थ्यांच्या भौतिक अडचणी दूर करणे.<br>आकलनावरील प्रश्न विचारणे.<br>चुका क्षमाशीलवृत्तीने नजरेस आणून देणे.<br>गुणी विद्यार्थ्यांचा गौरव करणे.<br>न्यूनगंड निर्माण न होता चुका नजरेस आणून देणे.<br>अभ्यासात आड येणारी विद्यार्थ्यांची व्यसने दूर करणे. |

| अ.नं. | गुण | अध्ययन-अध्यापन कृती |
|---|---|---|
| | | अभ्यासाला विघातक छंद व संवयी दूर करणे. |
| १. | अध्यापन विषयाचे नियोजन | स्वाध्याय वह्या तपासून त्यातील चुका दुरुस्ती करवून घेणे.<br>मासिक गृहपाठ नियोजन करणे.<br>सहशालेय उपक्रमांना विचारात घेऊन घटक नियोजन करणे.<br>पाठाचे तपशीलवार टिप्पण तयार करणे.<br>वाङ्मयीन प्रकारानुसार घटक नियोजन करणे.<br>दैनिक पाठ टाचण काढणे.<br>पाठाचे त्रोटक टिप्पण करणे.<br>पाठातील मुख्य मुद्यांचे टिप्पण करणे.<br>सहजपणे उत्तरे देता येतील असे स्वाध्याय देणे. |
| २. | प्रभावी व्यक्तिमत्व | अचूकरित्या फलक लेखन करणे.<br>स्वतः शुध्दलेखन नियमांचा अभ्यास करणे.<br>व्याकरण विषयक ज्ञान वाढविणे.<br>शब्द व्युत्पत्ती सांगणे.<br>आपल्या मनावर प्रभाव पाडणाऱ्या दोन कादंबऱ्या व दोन नाटके. |
| [illegible]. | संशोधन-शीलता | शब्द अचूकरित्या उच्चारणे.<br>__उच्चार :__<br>अचूक उच्चारांची आवर्तने करवून घेणे.<br>अचूक उच्चारांची टेप केलेली व्याख्याने ऐकविणे.<br>अचूक शब्दोच्चार सामुदायिक म्हणवून घेणे.<br>दृक् साधनांचा वापर करणे.<br>__वाचन :__<br>स्वतः निर्दोष वाचन करून दाखविणे.<br>स्पष्ट आवाजात वाचन करवून घेणे.<br>अर्थहानी न होता वाचाभ्यास शिकविणे.<br>अर्थ आकलनाच्यादृष्टीने विरामचिन्हांनुसार वाचन करणे. |

| अ.नं. | गुण | अध्ययन-अध्यापन कृती |
|---|---|---|
| | | हस्ताक्षर :<br>विद्यार्थ्यांच्याकडून सुवाच्च अक्षर लेखन करवून घेणे.<br>अक्षरात, शब्दात योग्य अंतर तपासून पहाणे.<br>विरामचिन्हांचा वापर शिकविणे.<br>हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करणे.<br>पाठांतर :<br>योग्य पाठांतर पध्दती समजावून सांगणे.<br>विषयास अनुसरून पाठांतर करावयास शिकविणे.<br>दृक्-श्राव्य साधनांचा वापर :<br>दृक्-श्राव्य साधनांची माहिती. |
| ५. | वाङ्.मयीन संस्कारक्षम मन | भजन, पोवाडे, लावण्या, लोकगीतांचे संकलन करणे.<br>विद्यार्थ्यांचे हस्तलिखित मासिक काढणे.<br>वर्गवार लेखन मंडळे तयार करणे.<br>नाट्यवाचनातून भावनाभिनिवेश व्यक्त करणे.<br>लिहिलेल्या दोन कविता. |
| ६. | आत्मविश्वास-पूर्वक अध्यापन | अभ्यासक्रमाचे पूर्णज्ञान प्राप्त करणे.<br>स्वविचार सोप्या शब्दात मांडण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या अंगी वाढविणे. |
| ७. | अध्यापन तंत्र ज्ञान मूल्यमापन ज्ञान | सोपी भाषा वापरणे.<br>विचारप्रवर्तक प्रश्न विचारणे.<br>बुध्दीला आवाहन देणारे प्रश्न विचारणे.<br>मध्यम बौध्दिक कुवतीनुसार प्रश्न विचारणे.<br>स्मरणशक्तीवरील प्रश्न विचारणे.<br>बहुपर्यायी प्रश्न विचारणे.<br>वाक्यपूर्ती प्रश्न विचारणे.<br>वाक्यजुळणी प्रश्न विचारणे. |

| अ.नं. | गुण | अध्ययन-अध्यापन कृती |
| --- | --- | --- |
| | अध्यापनतंत्राचे सम्यक ज्ञान | म्हणी, वाक्प्रचार, ऐतिहासिक, पौराणिक उदाहरणे सांगणे.<br>आवड निर्माण करणारे अध्यापनतंत्र वापरणे.<br>विद्यार्थ्यांच्या कल्पनाविलासाला वाव देणे. |
| | अध्यापनपध्दती-विषयी ज्ञान | स्वयंशिक्षण पध्दतीचा अवलंब करणे.<br>स्वयंशिक्षण अध्यापन पध्दती - गुण व दोष यांची माहिती.<br>प्रकल्प पध्दतीचा अवलंब करणे.<br>प्रकल्प पध्दती - गुण व दोष यांची माहिती.<br>डाल्टन पध्दतीचा अवलंब करणे.<br>व्याख्यान पध्दतीचा अवलंब करणे.<br>व्याख्यान पध्दती - गुण व दोष यांची माहिती.<br>चर्चा पध्दतीचा अवलंब करणे. |
| | संदर्भ शोधना-ची माहिती | संदर्भ पुस्तकांची माहिती. |
| ८. | बहुश्रुतता | स्वत: शैक्षणिक सहली, प्रवास यामध्ये सहभागी होणे.<br>परिसंवाद आयोजित करणे.<br>पाठांतरासाठी योग्य म्हणी, वाक्प्रचार, काव्यपंक्ती सुभाषिते सुचविणे.<br>सर्व वाङ्मयप्रकारांची माहिती करून देणे.<br>कवी, लेखक इ.चे संमेलन आयोजित करणे.<br>ऐकलेले कार्यक्रम, व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, कथाकथन, ग्रंथ परीक्षण इत्यादी.<br>वर्गवार वक्तृत्व मंडळे तयार करणे.<br>दिलेली व्याख्याने विषय. |
| ९. | इतर अध्यापकांचे सहकार्य | शुध्द उच्चार करण्याबाबत इतर विषय शिक्षकांचे सहकार्य मिळविणे.<br>निर्दोष वाचन करण्याबाबत इतर विषय शिक्षकांचे सहकार्य मिळविणे. |

| अ.नं. | गुण | अध्ययन-अध्यापन कृती |
|---|---|---|
| | | वळणदार फलक लेखन करण्याबाबत इतर विषय शिक्षकांचे सहकार्य मिळविणे.<br>संदर्भ ज्ञान वाढीसाठी ग्रंथसूची देण्याबाबत इतर विषय शिक्षकांचे सहकार्य मिळविणे.<br>हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्याबाबत इतर विषय शिक्षकांचे सहकार्य मिळविणे. |
| १०. | अभ्यासपूरक परीक्षा | विद्यार्थ्यांना बहि:स्थ परीक्षांना बसविणे. |
| ११. | नाट्यात्मकता | नाट्यवाचनात पात्रसंवादानुरूप हावभाव करणे.<br>पात्रसंवादानुसार आवाजात चढ-उतार करणे.<br>नाटक, एकांकिकेमध्ये काम करण्यास उत्तेजन देणे.<br>स्वत: नाटकात काम करणे. |
| १२. | उद्दिष्ठानुरूप अध्यापन | मराठी अध्यापनाच्या मूलभूत उद्दिष्ठांची माहिती. |

| अ.नं. | भाषाकौशल्ये | अध्ययन-अध्यापन कृती |
|---|---|---|
| १. | श्रवण | महत्वपूर्ण संज्ञांचे आकलन होईल अशा पध्दतीने श्रवण करणे.<br>मध्यवर्ती कल्पना समजावून घेऊन श्रवण करणे.<br>अर्थ समजावून घेऊन श्रवण करणे. |
| २. | वाचन | विद्यार्थ्यांना पूरक वाचन सुचविणे.<br>वाचनातील विचार चटकन् कळण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या अंगी वाढविणे.<br>वर्गवार वाचन मंडळे तयार करणे.<br>ताल व भाव यांचा अविष्कार घडविणारे पद्यवाचन करणे. |

| अ.नं. | भाषाकौशल्ये | अध्ययन-अध्यापन कृती |
|---|---|---|
| ३. | उच्चार | वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे.<br>श्राव्य साधनांचा वापर करणे.<br>आकाशवाणीवरील शालेय पाठ ऐकविणे.<br>विद्यार्थ्यांच्या अचूक शब्दोच्चारांची आवर्तने करणे. |
| ४. | अवलोकन<br>चिंतन, मनन | विद्यार्थ्यांच्या बौध्दिक स्पर्धा घेणे.<br>श्रेष्ठ साहित्य प्रकारांचे वाचन, चिंतन, मनन करणे.<br>भाषाकौशल्याचा विकास व्हावा म्हणून उपक्रम राबविणे. |
| ५. | उपयोजन | कवितांना चाल लावविणे.<br>अर्थपूर्ण वाचनावर आधारीत लेखन स्वाध्याय देणे. |
| ६. | प्रकटीकरण | पांडित्यपूर्ण शब्दमाध्यमातून महत्वाचे विचार मांडणे.<br>भाषणाचा आशय तात्काळ समजण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या अंगी वाढविणे.<br>अलंकारिक शब्द माध्यमातून महत्वपूर्ण विचार मांडणे.<br>निबंध स्पर्धा आयोजित करणे.<br>विद्यार्थ्यांना गोष्टी सांगणे.<br>रसानुरूप, शब्द, वाक्यांश यावर भर देऊन नाटयवाचन करणे.<br>आकृत्याद्वारे माहिती सांगणे.<br>गायन स्पर्धा आयोजित करणे.<br>अचूक लेखन आवर्तने करणे.<br>लेखन सराव देणे.<br>फलकावर सुविचार लिहून घेणे. |
| ७. | पाठांतर | अर्थपूर्ण पाठांतर समजावून देणे. |

सूचना :

या संशोधनामधून शेकडा १६.४ मराठी अध्यापकांना मराठी अध्यापनाचे प्रशिक्षण नसल्याचे आढळून आले. मराठी अध्यापकांना किमान अध्यापनाचे तंत्र ज्ञान माहिती असणे आवश्यक आहे. यासाठी बी.ए. च्या व एम्.ए. च्या अभ्यासक्रमामध्ये मराठीचे अध्यापन हा विषय शासनाने (प्रथम ऐच्छिक व क्रमाने नंतर आवश्यक म्हणून) अंतर्भूत करावा. मराठी अध्यापक म्हणून पदार्पण करणाऱ्या नवीन अध्यापकांना अधिक उपयुक्त होईल. तसेच मराठीचे अध्यापन या विषयाला प्रतिष्ठा प्राप्त होईल. मराठीच्या अध्यापनासंबंधी सतत चांगला अभ्यास होत राहील.

शे. १७.८ मराठीचे अध्यापक शाळेपासून १० ते ४० कि.मी. अंतरावर राहून शाळेला दररोज येत जात असताना आढळून आले. इतक्या अंतरावरून पायी चालत किंवा अन्य वाहनाने जरी दररोज शाळेला आले तरी त्यांच्या दररोजच्या या प्रवासामुळे त्यांच्या अध्यापनावर होणारा परिणाम टाळण्या-साठी अशा मराठी अध्यापकांनी शाळेच्या परिसरामध्ये रहावे. शाळेच्या परिसरामध्ये राहिल्यामुळे ग्रंथालयातील संदर्भग्रंथांचा संदर्भज्ञान वाढीसाठी अधिक उपयोग करून घेता येईल. शाळेच्या परिसरामध्ये राहिल्याने येण्या-जाण्यामध्ये त्यांची अधिक शक्ती खर्ची होणार नाही.

शेकडा ८१.१ मराठी अध्यापकांना वाचन छंद असल्याचे दिसून आले. पण लेखन, गायन, श्रवण, पाठांतर व भाषण हे छंद बऱ्याच अध्यापकांना नसल्याचे आढळून आले. शेकडा ५.३ मराठी अध्यापकांना एकही छंद नसल्याचे दिसून आले. वरील छंद मराठी अध्यापनास उपयुक्त असून ज्या अध्यापकांनी लावून घेतलेले नाहीत त्यांनी विषयज्ञान वाढविण्याच्यादृष्टीने वरील छंद लावून घ्यावेत.

शेकडा ३५.५ मराठी अध्यापकांच्याकडे `वाङ्मयीन संस्कारक्षम मन` हा गुण नगण्य असल्याचे आढळून आले. मराठी अध्यापकांनी `वाङ्मयीन संस्कारक्षम मन` बनवावे. सृजनशील लेखन करून विद्यार्थ्यांना त्यासंबंधी प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करावे. यासाठी वर्गवार लेखन मंडळे, हस्तलिखिते, विविध काव्यप्रकारांचे संकलन, नाट्यवाचन, इत्यादी उपक्रम घ्यावेत. शाळेमध्ये व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, कृतिसत्रे, साहित्य संमेलने आयोजित करावीत. हे उपक्रम मराठी अध्यापन प्रभावी होण्याच्यादृष्टीने उपयुक्त ठरतील. ज्या शाळांना अशाप्रकारचे उपक्रम करणे शक्य नाही अशा शाळांमधील मराठी अध्यापकांनी वरील कार्यक्रमांच्या टेप्स ऐकाव्यात, विद्यार्थ्यांना ऐकवाव्यात.

शेकडा २०.१ मराठी अध्यापक अध्यापनाची उद्दिष्टे विचारात न घेताच अध्यापन करताना आढळून आले. वास्तविक मराठी अध्यापकाला अध्यापनाची मूलभूत उद्दिष्टे माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून अध्यापन केल्यास उद्दिष्टे सफल झाली किंवा नाही याची पडताळणी करता येते. उद्दिष्टहिन अध्यापन म्हणजे `अथांग सागरामध्ये सुकाणूविना भरकटत असलेल्या दिशाहिन होडीप्रमाणे` अवस्था होय. म्हणून मराठी अध्यापकानी उद्दिष्टानुसार अध्यापन करावयास हवे.

शेकडा ४१.८ मराठी अध्यापकांनी आपल्या पदवीसाठी मराठी विषय घेतलेला नव्हता. त्यातील शेकडा २८.३ मराठी अध्यापकांनी अध्यापनाची आवड असल्यामुळे प्रशिक्षण पूर्ण केले पण शेकडा १२.५ मराठी अध्यापकांना मराठीचे सखोल ज्ञान नसताना मराठी अध्यापनाची जबाबदारी मुख्याध्यापकांनी सोपविल्यामुळे त्यांना अध्यापन करावे लागले असे दिसून आले. शाळांच्या मुख्याध्यापकांनी पदवी परीक्षेला मराठी विषय असलेल्या व मराठी अध्यापनाचे प्रशिक्षण झालेल्या अध्यापकाकडे मराठीचे अध्यापन सोपवावे. अशा मराठी अध्यापकांच्या अध्यापनातून उत्तम फलनिष्पत्ती होईल.

## संशोधनासाठी सूचना :

प्रस्तुत संशोधनामध्ये मराठी अध्यापकास आवश्यक ते गुण व भाषाकौशल्ये यांचा अभ्यास करून त्यांची प्रमाणके तयार केली असून प्रभावी अध्यापनासाठी ही प्रमाणके उपयुक्त ठरतील. तथापि या संशोधन विषयाच्या अनुषंगाने काही बाबींवर संशोधन होणे आवश्यक आहे असे वाटते.

मराठी अध्यापकास आवश्यक ते गुण व भाषाकौशल्ये यांची प्रमाणके तयार करून त्यांच्या प्रमाणित कसोट्या (Standardised Tests) तयार करता येतील. मराठी अध्यापक आणि विद्यार्थी यांना त्यांचा निश्चितपणे उपयोग होईल.

मराठी अध्ययन-अध्यापनाला उपयुक्त असे पूरक साहित्य तयार करून त्यांची अध्यापनातील परिणामकारकता पडताळून पहाता येईल.

## टीपा - संदर्भसूची

1. CHESTER W. HARRIS, (Editor), "Encyclopedia of Educational Research", Chapter- Teacher effectiveness, Third edition, pp. 1488-90.

2. "Importance of Auditing Comprehension", Scheres George A., pp. 223-25.